जनसंपर्क अधिकारी कार्यालय, ठाणे शहर.

P.R.O. OFFICE, DCP ZONE-1, THANE CITY.

Address - Office of Dy. Commissioner of Police, Zone-1, Thane, Jail Road Thane, Near Old R.T.O. Office, Opp. Central Ground, Thane (W). Maharashtra - 400 601.
Email id :- cp.thane.pro@mahapolice.gov.in Contact No. - +91 9819028279

प्रेस नोट दि.१८/०५/२०२३

गृहकर्जासाठी न्यायालय व पोलीसांची बनावट कागदपत्रे बनवुन फसवणुक करणा-या आरोपीस मुंब्रा पोलीसांकडुन अटक

दिनांक ७/०५/२०२३ रोजी मुंब्रा पोलीस स्टेशनच्या तपास पथक अधिकारी मसपोनिरी/कृपाली बोरसे यांना गुप्त बातमीदारां कडुन माहिती मिळाली की, जानेवारी-२०२३ रोजी पासुन ते दिनांक ०७/०५/२०२३ रोजी दरम्यान त मो.अकदम अकम कुरेशी यांना व्यवसायाकरीता पैशांची आवश्यकता असल्याने त्यांचे परिचयातील नबील अकबर शेख या इसमाने १२ लाख रुपये लोन मिळवुन देतो व लोनची प्रकीया करतांना सायबर अॅटॅक झालेला आहे असे सांगुन जिल्हा न्यायाधिश व सायबर सेल, ठाणे येथील अधिका-यांचे नाव, सहीचे लेटरहेड, पोलीस व न्यायालयाचा बनावट लोगो तसेच कागदपत्रे वापरुन न्यायालय व पोलीसाचे बनावट ईमेल आय.डी.वरुन ईमेल करुन सिक्युरीटी डिपॉझीट, लोन रिफंन्ड फी, न्यायालयाचा दंड असे विविध कारणावरुन नबील अकबर शेख याने मो.अकदम अकम कुरेशी यांचेकडुन वेळोवेळी रोख स्वरुपात तसेच अकाऊंन्टवर पैसे ट्रांन्सफर करुन एकुण १,११,०००/- रुपये प्राप्त करुन फसवणुक केली असल्याची माहिती प्राप्त झाली. याबाबत मसपोनिरी/बोरसे यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.कोल्हटकर यांना माहिती दिलेनंतर त्यांनी मसपोनिरी/बोरसे यांना कायदेशीर कारवाई करणेबाबत मार्गदर्शन व सुचना केल्या. त्यानुसार मसपोनिरी/बोरसे यांनी आरोपीस ताब्यात घेणेकामी सापळा लावुन आरोपीस फिर्यादी यांचे मार्फत पैसे घेण्याकरीता गुलशन हॉटेल, मुंब्रा येथे बोलाविले असता आरोपी सदर ठिकाणी येण्यास तयार झाल्याने तपास पथकातील अंमलदार यांचेसह सदर ठिकाणी सापळा लावुन गुन्हयातील आरोपी नबील अकबर शेख यास गुन्हयात वापरलेल्या दोन मोबाईल फोनसह ताब्यात घेवुन पोलीस ठाण्यात हजर केले.

नमुद आरोपीकडे गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने मो.अकदम अकम कुरेशी यांनी दिलेल्या तकारीवरुन मुंब्रा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद क. । ५०२/२०२३ भा.दं.वि. कलम ४२०,४६५,४६७,४६८,४७१ सह आयटी अॅक्ट ६६(ड) अन्वये दि.८/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल केला करुन आरोपीतास दि.८/०५/२०२३ रोजी अटक करण्यात आली आहे.

गुन्हयाचा तपासात मा.अपर पोलीस आयुक्त, डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, परि-१, श्री. गणेश गावडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, कळवा विभाग, श्री. विलास शिंदे यांनी दिलेल्या सुचना व आदेशाप्रमाणे मुंब्रा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. निवृत्ती बापुराव कोल्हटकर यांचे मार्गदर्शनाखाली मसपोनिरी/कृपाली बोरसे, पोहवा/१२५५ संतोष पवार, पोना/७११७ विजय सपकाळे, पोना/१२०२ निलकंठ लोंढे, पोशि/२६३४ नवनाथ चव्हाण,पोशि/७७४४ खैरनार पोशि/७६४१ एडके,पोशि/२११६ जमदाडे, पोना/७३२५ जुवाटकर यांनी केला असुन सदर गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.निवृत्ती बापुराव कोल्हटकर हे करीत आहेत.